# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २०८ वा शुक्रवार दि.०७ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा

मुंबई : राज्यातील सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, अशी सूचना देत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असे स्पष्ट आदेश दिले आहेत.

शिवपाणंद आणि शेत रस्ते समृद्ध करण्याबाबत पब्लिक डोमेनच्या माध्यमातून नागरिकांच्या सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे, नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

### नागपूर पॅटर्न राबवणार

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, नागपूर जिल्ह्यात प्रती किलोमिटर केवळ आठ ते दहा लाख रुपये खर्चामध्ये उत्कृष्ट पाणंद रस्ते बनविण्यात आले आहेत. या कार्यपद्धतीचा सर्व जिल्ह्यांनी अभ्यास करून इतर जिल्ह्यांमध्येही याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच ग्रामस्तरीय शेतरस्ता समिती स्थापन करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा. रस्त्यांचे काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी. पाणंद रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत.

### मोजणीसह पोलीस संरक्षणासाठीची फी बंद करणार

पाणंद रस्ते, शेतरस्ते, सार्वजनिक वहीवाटीच्या रस्त्यांच्या मोजणी आणि पोलीस संरक्षणासाठी असलेली फी बंद करण्याचा विचार करण्यात येईल असे सांगून बावनकुळे म्हणाले, अशा रस्त्यांच्या नंबरींगचे सर्वेक्षण करुन नंबरींग हटवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. रस्त्यांच्या प्रकरणी तहसीलदारांच्या निर्णयावर उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अपील केल्यानंतर त्यांनीच अंतिम निकाल देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे सांगून शेतरस्त्यांचा उल्लेख झाल्याशिवाय वाटप पत्र मंजूर करण्यात येऊ नये यासाठीही शासन सकारात्मक असल्याचे सांगितले.

## महिला आयोग केवळ नेत्यांना पाठिशी घालण्यासाठी



मुंबई : राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते धनंजय मुंडे सध्या विविध कारणांमुळे चांगलेच अडचणीत आले आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात त्यांच्यावर राजीनामा देण्याची वेळ येण्याची शक्यता आहे. आता कौटुंबिक प्रकरणांत मुंडे दोषी ठरले आहेत. वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने मुंडे यांना झटका देताना त्यांना कौटुंबिक हिंसा प्रकरणात दोषी ठरवले आहे. करूणा मुंडेंना दरमहा २ लाखांची पोटगी देण्याचे आदेशही कौटुंबिक न्यायालयाने दिले आहेत. यानंतर करुणा मुंडे यांनी माध्यमांसमोर धनंजय मुंडे यांच्याविरोधात अनेक आरोप केले असून महिला आयोगासंदर्भात विचारण्यात आलेल्या प्रश्नावर उत्तर देताना करुणा मुंडे म्हणाल्या की राज्यातील महिला आयोग केवळ नेत्यांना पाठिशी घालण्यासाठी आहे. सध्या यामुळे राज्यात जोरदार चर्चा सुरू झाली असतानाच करुणा शर्मा यांनी थेट महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यावर जोरदार टीका केली आहे. करुणा शर्मा यांना, न्याय मागण्यासाठी महिला आयोगात गेला होतात का? असा सवाल विचारण्यात आला होता. या प्रश्नाचं उत्तर देताना करुणा शर्मा भडकल्या. त्यांनी, कोण महिला आयोग? रुपाली चाकणकर? काय म्हणायचं आहे तुम्हाला? महिला आयोगात केवळ नेते लोकांना पाठिशी घालण्यासाठी आहे. रुपाली चाकणकर यासाठीच तिथे बसल्यात, असा घणाघात केला आहे.

रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाचे अध्यक्ष बनवलय अवघड आहे. मी राष्ट्रीय महिला आयोगात गेले आहे. मी दिल्लीत जाऊन पैसे खर्च करत त्यांना निवेदन दिलेली आहेत. रुपाली चाकणकरांना महिला आयोगातून हटवा, अशी मागणी देखील राष्ट्रीय महिला आयोगाला केल्याचं करुणा शर्मा म्हणाल्या.

अनेक तक्रारी, पण काय केले त्यांनी?यावेळी करूणा शर्मा यांनी, आयोगाकडे खूप काही तक्रारी असतात. पण आजपर्यंत चाकणकर यांनी काय केले? काहीही नाही. मात्र आता न्यायालयात लढून लढून मला लॉ काय आहे? हे समजायला लागले आहे. जो आरोपी आहे, ज्याच्या विरोधात तुमच्याकडे तक्रारी आल्या आहेत. त्याच्यासोबत तुम्ही फोटोत एकत्रित येऊ नये, असा लॉ आहे. पण रुपालीताईंनी धनंजय मुंडेंची बाजू मांडली आहे. ते आरोपी आहेत ना? माझी मुंडेंच्याबाबत तक्रार आहे रुपालीताईंकडे. खूप तक्रारी आहेत, पण आजपर्यंत चाकणकर यांनी काहीही केलेले नसल्याचा दावा देखील करुणा शर्मा यांनी केला.

आता न्यायालयाने न्याय दिला असून धनंजय मुंडेंना वाटते की, कुठेतरी सेटलमेंट व्हायला पाहिजे. ही आर्थिकरित्या कमजोर झाली तर ही थांबेलही, त्यांना वाटते.

## येणाऱ्या निवडणुका कार्यकर्त्यांच्या जिव्हाळ्याच्या; सदस्य नोंदणी अभियानाच्या माध्यमातून घरोघरी जावे लातूर ग्रामीण भाजपा कार्यकर्त्यांच्या बैठकीत ना. अतुल सावे यांचे आवाहन

लातूर : – लोकसभा, विधानसभा नेत्यांच्या निवडणुका झाल्या, आता येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका कार्यकर्त्यांसाठी जिव्हाळ्याच्या आहेत तेव्हा भाजपाच्या सर्व लोकप्रतिनिधी पदाधिकाऱ्यांनी सदस्यता नोंदणी अभियानाच्या माध्यमातून घरोघरी जाऊन सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करावे असे आवाहन राज्याचे बहुजन कल्याण विकास मंत्री ना. अतुल सावे यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा सदस्य नोंदणी अभियान अनुषंगाने मंत्री ना. अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपाचे पक्ष पदाधिकारी, लोकप्रतिनिधीची आढावा बैठक गुरुवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद संपर्क कार्यालयात झाली यावेळी लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड, भाजपाचे मराठवाडा विभाग संघटन मंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, जिल्हा सरचिटणीस तुकाराम गोरे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष दशरथ सरवदे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.






लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात सर्व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळेच रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून भाजपाला यश मिळाले, मिळवलेल्या या यशाचे वलय कायम ठेवण्यासाठी येणाऱ्या काळात होणाऱ्या कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत घवघवीत यश संपादन करण्यासाठी सर्वांनी भाजपाच्या संघटन पर्व अंतर्गत सदस्य नोंदणी अभियान जबाबदारीने यशस्वी करावे असे आवाहन करून ना. अतुल सावे म्हणाले की, लातूर ग्रामीणची जागा वाघाच्या तोंडातील कार्यकर्त्यांनी निवडून आणली त्यामुळे सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करणे अवघड नाही. राज्यात देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात सक्षम ताक्तीचे सरकार सत्तेवर आले आहे हे सरकार अनेक योजना राबवत असून आपल्या मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी पक्ष संघटना मजबूत असली पाहिजे जिथे पक्ष संघटना मजबूत असेल तिथेच प्राधान्याने विकासाचा निधी मिळेल असेही अतुल सावे यांनी बोलून दाखविले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीतील विविध विकास कामासाठी कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला अनेक विकासाची कामे केली असे सांगून यावेळी बोलताना आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, पक्षाच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींनी येत्या १४ फेब्रुवारी पर्यंत ६० हजार आणि १९ फेब्रुवारी पर्यंत ९० हजाराहून अधिक भाजपा सदस्य नोंदणी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना केली.

## लातूरला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची सहकार मंत्री ना श्री बाबासाहेब पाटील यांना मागणी

लातूर :– आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृति समिति लातूरच्या वतिने लातूरला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचीं मागणी अनेक वर्षापासून लावून धरलेली आहे मुंबई येथे लातूर जिल्हाचे सुपुत्र तथा राज्याचे सहकार मंत्री ना बाबासाहेब पाटील यांची भेट घेत लातूर ला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे वृत्त सविस्तर– लातूरकराच्या आग्रही मागणीतून व लोकनेते स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या प्रयत्नातून २००७ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड उपकेंद्र पेठ लातुर येथे सुरु करण्यात आलेले आहे लातुर जिल्हयातंर्गत कला, वाणिज्य, विज्ञान ,औषधनिर्माण शास्त्र, विधी, अभियांत्रिकी, वैद्यकीय अनुदानित ३६ महाविद्यालय,कायम विनाअनुदानित ८० असे एकूण ११६ महाविद्यालय आहेत व त्यामध्ये एकूण विद्यार्थी संख्या ५५,४१०आहे ,या प्रशासकीय शैक्षणिक कामाचे स्वरूप लक्षात घेता महाविद्यालयीन प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, पालकांना नांदेडला पायपीठ करावी लागते आहे तर शेजारच्या सोलापूर जिल्हयासाठी महाविद्यालयांची संख्या १०९ असताना विद्यार्थी, पालक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सोईसाठी २०१४ मध्ये स्वतंत्र विद्यापीठ शासनाने दिलेले आहे. लातुर जिल्हाची शिक्षणातील भरारी पाहता लातूर पॅटर्न राज्यात व देशात सर्वदूर परिचीत आहे.आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या वतीने लातूरला स्वतंत्र विद्यापीठाची मागणी शासन दरबारी वेळोवेळी लावून धरलेली आहे, विद्यार्थ्याच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन मिळावे यासाठी लातुरला स्वतंत्र विद्यापीठाची मागणी सातत्याने करीत आहोत. राज्याचे माजी मंत्री वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा माजी पालकमंत्री आ अमित विलासराव देशमुख, राष्ट्रवादीचे नेते तथा माजी मंत्री आ संजय बनसोडे यांनी ही उपकेंद्राच्या शैक्षणिक कामकाजात ठराविक मर्यादा असल्यामुळे स्थानिक पातळीवर निर्माण होणारी शैक्षणिक व प्रशासकीय गैरसोय टाळण्यासाठी लातुर येथे स्वतंत्र विद्यापीठ करणे बाबत सहानुभूती पूर्वक विचार व्हावा अशा आशयाचे पत्र तत्कालीन मुख्यमंत्री मा ना उद्धव ठाकरे , मा ना उदय सामंत ,उच्च व तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य यांना दिलेले आहे तर आ सभाजी पाटील निलंगेकर, आ अभिमन्यू पवार यांनी ही मागच्या वर्षीच्या हिवाळी अधिवेशन काळात विद्यापीठाची मागणी लावून धरलेली आहे. मा सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग नांदेड व कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांचे शिफारस अहवालावरून लातुर येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्या बाबत विद्यापीठ कायदा २०१६ अंतर्गत कलम




३(२)नुसार शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही होणे गरजेचे असल्याचा अहवाल श्री डॉ धनराज माने, शिक्षण संचालक,उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य यांनी दि.१५.९.२०२० च्या पत्रांन्वये अप्पर मुख्य सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना अहवाल सादर केलेला आहे,त्यामुळे निकषांवर लातूरला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन होने गरजेचे व अत्याआवश्यक आहे.याबाबत राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री ना श्री देवेंद्र भाऊ फडणवीस,उपमुख्यमंत्री ना अजित दादा पवार यांना ही दि.४ मार्च २०२२ रोजी प्रत्यक्ष भेटुन निवेदनाद्वारे अवगत करून दिलेले आहे. राज्याचे तत्कालीन राज्यपाल सी विद्यासागर, भगतसिंह कोशहयारी, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री उदय सामंत, श्री चंद्रकांत दादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव श्री रस्तोगी आदीना भेटून निवेदन देण्यात आले आहे, आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीचे वतीने वेळोवेळी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वाक्षरी मोहीम,धरणे आंदोलन, निदर्शने, उपोषण आंदोलन, तत्कालीन मुख्यमंत्री ना श्री एकनाथ शिंदे यांना एक लाख पत्रांच्या माध्यमातुन लातूरला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. लातूर जिल्हयातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधीनी लातूर ला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यासाठी लातूर जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रातील विकासाचा आलेख उंचावत ठेवण्यासाठी जिल्हयातील लोकप्रतिनिधी यांच्या भेटी घेवून स्वतंत्र विद्यापीठ मागणीस सहकार्य करण्याचे आवाहन व विनंती करीत असल्याची माहिती मुख्य संयोजक अँड प्रदिपसिंह गंगणे यांनी मंत्री महोदयांना दिली आहे .

## टोल मध्येही ‘गुड न्यूज’!

नवी दिल्ली : वृत्तसंस्था केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२५–२६ सालासाठीचा अर्थसंकल्प संसदेत सादर केला. या अर्थसंकल्पात १२ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावरील कर माफ करण्यात आला आहे. मोदी सरकारने मध्यमवर्गाला दिलेला हा मोठा दिलासा आहे. त्यापाठोपाठ आता टोलमध्येही सरकार गुड न्यूज देणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या विशेष मुलाखतीमध्ये याबाबतचे संकेत दिले आहेत.



सरकारच्या योजनेतून लोकांना मोठा दिलासा मिळणार आहे, असे गडकरी यांनी सांगितले. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रदूषण आणि वाहतूकीची समस्या कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी अनेक योजना सुरु केल्या जाणार आहेत. त्यासाठी त्यांच्या मंत्रालयाचा अभ्यास पूर्ण झाला आहे, असे गडकरी यांनी स्पष्ट केले.

नव्या योजनेमुळे टोल समाप्त होणार का? या प्रश्नावर गडकरी यांनी सस्पेंस कायम ठेवला. या योजनेची घोषणा लवकरच केली जाईल असे त्यांनी सांगितले. सरकार उपग्रहावर आधारित टोल पद्धतीवर काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. याबाबतही निर्णय होणार आहे. पण, हा निर्णय या योजनेपासून वेगळा आहे. आगामी काळात टोल देणा–यांची नाराजी दूर केली जाईल, असे गडकरी यावेळी म्हणाले.

## संपादकीय....

# डीपसीकचा धसका आणि बंदी

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर जगाने मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे. त्यामुळे जगाची वाटचाल ही नव्या युगाच्या दिशेने होत असल्याचे पाहायला मिळत आहे. पण, प्रगत तंत्रज्ञानाचे फायदे जितके आहेत तितके तोटेही आहेत. सध्याचे जग कृत्रिम बुद्धिमत्तेचे मानले जाते. यामध्ये सर्वाधिक आघाडी घेतली आहे ती चीनने! कोणत्याही आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून जगाचे स्वास्थ्य बिघडवण्यात चीन काहीच कसर सोडत नसल्याचे दिसत आहे. अनेक चिनी ॲप जगभरात उपलब्ध आहेत. त्यातही ती मोफत उपलब्ध होत असल्याचे त्याकडे सर्वांचा ओढा वाढणे हे साहजिक असले तरी त्याचे धोके जाणून घेण्याची गरज आहे.

आता चीनच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) चॅटबॉट डीपसीकने जगभरातील एआय मार्केटमध्ये धुमाकूळ घातला आहे. हे ॲप मोफत आणि सहज संगणक आणि मोबाईलवर अपलोड होत असल्याने अन्य एआय कंपन्यांचे शेअर मोठ्या प्रमाणात घसरल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. अमेरिकेसारख्या बड्या राष्ट्रांनेही या डीपसीकचा धसका घेतल्याचे समोर आले आहे. अशातच अमेरिकन संसद आणि काँग्रेसने त्यांच्या कार्यालयात डीपसीकच्या वापरावर बंदी घातली आहे. डीपसीकचे धोके लक्षात घेऊन यावर इटली आणि आयर्लंड या देशांनीही बंदी घातली आहे.

भारतातही केंद्रीय अर्थमंत्रालयाने आपल्या कर्मचार्यांना चॅटजीपीटी आणि डीपसीकसारखे एआय मॉडेल वापरण्यावर बंदी घातली आहे. त्यामुळे कर्मचारी आता मंत्रालयाने दिलेले संगणक, लॅपटॉप आणि टॅब्लेटसारखे डिवाईस वापरू शकणार नाहीत. आता अमेरिकेत एआयच्या जलद विकास हा राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रशासकीय आव्हानांना सामोरे जावे लागत असल्याचे सांगत कोणत्याही संभाव्य धोक्याचा सामना करण्यासाठी संसदेने जारी केलेल्या सर्व उपकरणांमध्ये डीपसीकच्या वापरावर बंदी घातली आहे. इतकेच नाही तर कर्मचार्यांना अधिकृत फोन, संगणक आणि टॅब्लेटवर डीपसीक अपलोड करण्यावर अमेरिकेने बंदी घातली आहे. डीपसीक एक एआय चॅटबॉट आहे. केवळ त्याला आज्ञा दिल्यानंतर त्याचे निकाल समोर येतात. चॅटजीपीटी, मेटा आणि अन्य एआय मॉडेल करू शकणारी सर्व कामे डीपसीक करू शकते. तेही कोणतेही शुल्क न आकारता हे विशेष! डीपसीक हे एआय कोडिंग आणि गणितासारखी गुंतागुंतीची सर्व कामेही अचूकपणे पूर्ण करते. डीपसीक हे जगभरातील कोणासाठीही अगदी सहज, पूर्णपणे मोफत आणि मुक्तपणे मिळते.

चीनचे हे मॉडेल अगदी कमी खर्चात तयार केले आहे. खरेतर एनव्हीडिया, मायक्रोसॉफ्ट आणि मेटा यासारख्या अमेरिकन बड्या कंपन्यांनी एआय मॉडेल्स तयार करण्यासाठी मोठी गुंतवणूक केली आहे. त्यामुळे या कंपन्यांनी डीपसीकचा धसका घेतला आहे. डीपसीक हे एआय मॉडेल चीनने केवळ ४८.४५ कोटी रुपयांमध्ये विकसित केले आहे. हे ॲप डीपसीकचे ॲप संकेतस्थळ आणि ॲपलच्या ॲप स्टोअरवरून सहजपणे डाऊनलोड केले जाऊ शकते. त्यामुळे संभाव्य धोका लक्षात येत्या काही दिवसांत डीपसीकवर जगभरात बंदी घातली नाही तर नवल वाटू नये!

# त्याग,संघर्ष,मातृत्व व प्रेम यांचा संगम म्हणजे माता रमाई!

एका कवींच्या गीताचे बोल
माझ्या भीमाची सावली दीनदलीतांची आई
अशी भाग्यशाली त्याग मुर्ती माता रमाई

माता रमाई म्हणजे बाबासाहेबांच्या जीवनातील एक अनमोल ठेवा. एक अनमोल रत्न.आयुष्यभर बाबासाहेबांच्या सुखदुःखात चंदनाप्रमाणे झिजून खंबीरपणे साथ देणारी एक धगधगती ज्योत.बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनातील एक प्रेरणा, एक आधारस्तंभ म्हणजे माता रमाई.

खूप मोठ्या गरीबीत,दु:खात,दारीद्र्यात अडचणीत व कठीण काळात दिवस कंठीत रमाईने बाबासाहेबांना खूप मोठी साथ दिली. आपल्या सर्व आशा अपेक्षांचा त्याग, सुखाचा त्याग,आपली चार मुले जाण्याचं दु:ख तो त्याग आपल्या अंर्तमनात पचवून हृदयात साठवून, ते दु:ख बाबासाहेबांना कळू न देणारी माता रमाई.

आपल्या पोटच्या गोळ्याची निधनाची वार्ता बाबासाहेब घरी येईपर्यंत त्यांना माहीत पडू न देणारी माता रमाई.एवढा त्याग की त्यागालाही लाज वाटावी एवढा त्याग केला माता रमाईने.

कारण ते दु:ख बाबासाहेबांना सांगितले असते, माहीत पडले असते तर त्यांच्या शिक्षणात व्यत्यय आला असता. शिक्षणातील लक्ष विचलित झाले असते,ते होऊ नये म्हणून सर्व दु:ख साहेबांपासून लपवून ठेवले.अशी थोर, धैर्यवान व साहसी हृदयाचे काळीज असणारी माता रमाई!

राजरत्न हा रमाई चा मुलगा जेव्हा दगावला होता, त्यावेळी त्याला झाकण्यासाठी कपडा नव्हता. किती वेदना झाल्या असतील त्या माऊलीला.पण तरी सुध्दा बाबासाहेबांना एका शब्दानेही दुखावले नाही. एक शब्द सुध्दा बोलल्या नाहीत.

माता रमाई अडाणी असुन सुध्दा किती सहनशीलता, किती मोठा समजुतदारपणा! उच्च शिक्षित स्त्रीला सुध्दा लाजवेल एवढा.

कशासाठी होती एवढी सहनशीलता,एवढा त्याग, एवढं मातृत्व,एवढे प्रेम तर कोटी कोटी जीवांना अन्याय,अत्याराच्या जाचातून काढण्यासाठी.त्यांच्यावर होत असलेला अन्याय, अत्याचार दुर करण्यासाठी.त्यांना दारिद्र्य पिडीताअवस्थेतून बाहेर काढण्यासाठी, त्यांच्या उध्दारासाठी!

एका गाण्याचे बोल आहेत.
नांदनं नांदनं माझ्या रमाच नांदनं! भीमाच्या संसारी जसे टिपूर चांदनं!

खरोखर रमाईमुळे बाबासाहेबांच्या जीवनात प्रकाश होता.स्त्री घराची शोभा,घराचे सौंदर्य,घराचा साज, घराचा अलंकार कसा असतो हे रमाईच्या आदर्शातून आजच्या स्त्रीला शिकण्यासारखे आहे.घर कसे सांभाळायचे,स्त्री घराची आण बाण शान कशी असते हे रमाईच्या आदर्शातून शिकण्यासारखे आहे.समजदारपणा,गुणसंपन्न,स्वाभीमानी,चारीत्र्यवान,शीलसंपन्न बाबासाहेबांच्या जीवनात संकटसमयी साथ देणारी,चोहोबाजुंनी संकटाचा सामना करावा लागला असताना सुध्दा आदराने, धैर्याने मानसन्मान पुर्वक जीवन जगण्याचा आदर्श आमच्या समोर ठेवणारी माता रमाई!

एका गाण्याच्या बोलाप्रमाणे
पै पैसा लावण्या भीमाला,रमाने थापल्या गोवऱ्या,फाटक्या लुगड्यात नांदली रमाई, तवा शालुत नटल्या आजच्या नवऱ्या.

माता रमाईने शेणाच्या गोवऱ्या थापून त्या विकून पैसे पैसा जमा केला. कष्टाने,मेहनतीने,स्वाभीमानाने संसाराचा गाढा चालवला. गोवऱ्या विकून काही पैसे संसारासाठी खर्च करून त्यातून उरलेले पैसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणासाठी दिले. कपडेलत्ते,साडीचोळी,दागदागीने,अलंकार, खानेपिणे,अशा कोणत्याही गोष्टींची हव्यास न धरता मिळेल तो घास, मिळेल तो कपडा, यामध्ये समाधान मानून दिवस काढले,पण कधी बाबासाहेबाकडे कोणत्याही गोष्टींची मागणी केली नाही.ना हव्यास धरला नाही. ना कोणती अडचण सांगितली नाही.कोटी जीवाच्या उध्दारासाठी बाबासाहेबांना साथ देणारी अशी उदारमतवादी माता रमाई!

एका कवीने म्हटल्याप्रमाणे
गरीबी जरी त्या संसारात होती,तरीपण रमाची भीमाला साथ होती.
भीमराव होते दिव्याच्या समान, रमाई त्या दिव्याची वात होती

मेणबत्तीने जसे स्वतः जळावे आणि इतरांना प्रकाश द्यावा. चंदनाने झिजावे आणि इतरांना सुगंध द्यावा अगदी त्याप्रमाणे रमाई स्वतः जळल्या आणि म्हणून आज आमच्या जीवनात प्रकाश आहे.

धारवाडच्या वसतीगृहातील लहान मुलांना उपाशीपोटी पाहून रमाईने आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून दिल्या.वसतीगृह चालवणारे वराडे यांच्याकडे दिल्या. आणि सांगितले विका किंवा गहाण ठेवा आणि मुलांना खायला आणा.अशी उदारमतवादी माता रमाई!

एक गायक आपल्या गीतात लिहितात.
भुकेल्या मुलाची दशा पाहूनी, बांगड्या सोन्याच्या
रमानं दिल्या काढूनी! धन्य रमाई ती धन्य रमाई!



अशा या थोर माता रमाईचा जन्म एका गरीब कुटुंबातील भिकू धुत्रे व रुक्मिणी वलंगकर यांच्या घरी ७फेब्रुवारी १८९८ रोजी झाला. सुरवातीपासुनच दु:खी,कष्टी,हलाकीचे जीवन माता रमाईच्या वाट्याला आले.लहानपणी आईवडिलांचे निधन झाले.काका आणि मामासोबत मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत राहायला आले.१९०६ मध्ये भिमरावासोबत रमाईचे लग्न झाले. आणि दु:खात,व गरीबीत सुध्दा आनंद, प्रेम,ममतापुर्ण असणारा संसाराचा आदर्श निर्माण करुन ठेवला माता रमाईने!

एक गोष्ट याठिकाणी विशेष सांगण्यासारखी आहे. ती म्हणजे जेव्हा सिध्दार्थ गौतमाने शाक्य आणि कोलीय यांच्यात रोहानी नदीच्या पाण्याच्या होणाऱ्या वादाला विरोध केला.ते संघाच्या नियमाच्या विरुद्ध गेले म्हणून त्यांना गृहत्यागाचा मार्ग स्विकारावा लागला.हि गोष्ट जेव्हा त्यांच्या घरी समजली,तेव्हा त्यांचे आईवडील रडू लागले.आणि जेव्हा ते घरी आले तेव्हा आपले आईवडील रडत आहेत.पण माता यशोधरा बाजुला कुठे दिसली नाही.ते यशोधरेच्या दालनात गेले.त्यांना असे वाटले की, हि बातमी ऐकुन यशोधरा मुर्शीत (बेशुध्द) होऊन पडेल.पण सिध्दार्थ गौतमाचा गृहत्यागाचा निर्धार पाहून माता यशोधरा सिध्दार्थ गौतमांना म्हणाल्या,तुम्ही तर आता आम्हाला सोडून जात आहात.तेव्हा असा एक जीवनमार्ग शोधून काढा. की तो मानवाच्या दु:खमुक्तीचा आणि कल्याणाचा मार्ग ठरेल.माता यशोधरेचे हे शब्द ऐकून त्यांना आपल्या पत्नीचा खूप मोठा अभिमान वाटला.एवढी धैर्यवान,साहसी पत्नी आपल्याला लाभली याबद्दल त्यांनी माता यशोधरेचे मनोमन आभार मानले.

तसेच एकही वर्ग न शिकलेली माता रमाई, बाबासाहेब जेव्हा परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी जातात तेव्हा माता रमाई त्यांना म्हणतात, साहेब तुम्ही उच्च शिक्षण घेण्यासाठी तर जात आहा. पण एवढे शिका.की हा समाज जो अन्याय अत्याचाराच्या आगीत होरपळत आहे.या समाजाचे दु:ख दुर करा. रमाईच्या या वाक्याचा बाबासाहेबांच्या मनावर खुप मोठा परिणाम झाला. की आपली पत्नी अडाणी असतांना तिच्या डोक्यात एवढा थोर विचार यावा. या गोष्टीचे बाबासाहेबांना भुषण तर वाटलेच पण रमाईच्या या शब्दाने बाबासाहेबांना खूप मोठी प्रेरणा सुध्दा मिळाली या प्रेरणेमुळे बाबासाहेबांनी १८-१८ तासच नाही तर २१-२१ तास अभ्यास केला.कारण बाबासाहेबांच्या अंत:करणातील गोष्ट रमाई बोलल्या होत्या.या गोष्टीने त्यांचे उर भरुन आले. त्यांनी रमाईकडे डोळे भरून पाहिले.आणि परदेशी शिक्षणाला गेले. अशी थोर रमाई.

माता यशोधराने सिध्दार्थ गौतमाला बोललेले शब्द आणि माता रमाईने बाबासाहेब आंबेडकरांना म्हटलेले शब्द तंतोतंत जुळतात. हे याठिकाणी विशेष.

अशा या थोर माता रमाईला शरीर प्रकृती कडे लक्ष न दिल्यामुळे टि. बी चा आजार जडला. बाबासाहेबांनी रमाईची खूप काळजी घेतली पण आजार मात्र वाढत गेला आणि अशा आजारात माता रमाईचा २७ मे १९३५ ला मुंबई राजगृह येथे मृत्यू झाला. बाबासाहेबांना या गोष्टीचे खूप दु:ख झाले. कारण बाबासाहेबांचे माता रमाई वर निस्सीम प्रेम होते. रमाईचे कष्ट पाहून बाबासाहेबांचे मन तुटायचे,त्यांनी रमाईला पाठवलेल्या पत्रात या भावना प्रतिबिंबित व्हायच्या.१९४० मध्ये बाबासाहेबांनी लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ रमाईला अर्पण केला.

अर्पणपत्रिकेत बाबासाहेब लिहितात तिच्या हृदयाचा चांगुलपणा,मनाची कुलीनता,आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्य,माझ्याबरोबर दु:ख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसात तिने मला दाखविली, जेव्हा मी मित्रविरहित चिंतेसह काळ कंठीत होतो. अशा बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या आपल्या (रामुच्या) माता रमाईच्या आठवणीतील अर्पण पत्रिकेतील या भावना बाबासाहेबांनी प्रकट केल्या.

अशा या थोर माता रमाई आणि त्यांच्या कार्यास रमाईच्या या जयंती दिनी कोटी कोटी प्रणाम!

*********

विनोद सरदार
फुले आंबेडकर विद्वत सभा
मो.नं. ९६८९८४७११५

# करुणामूर्ती माता रमाई !

भिकू धुत्रे यांची मुलगी रमा व सुभेदार रामजी सकपाळ यांचे पुत्र भीमराव यांचा विवाह मुंबईतील भायखळा भाजीमंडीमध्ये झाला. त्यावेळी रमा ९ वर्षाची व भीमराव १४ वर्षाचे असतांना त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रुढ होती. समाजाने देखील मान्यता दिली होती. विवाह अत्यंत साध्या पध्दतीने पार पडला. रमा लहान असतांनाच आई व वडीलांचे छत्र हरपले होते. तेव्हा रमाच्या कोवळ्या मनावर आघात झाला. परिस्थिती देखील बेताचीच होती. मामा व काकांनी चार भावंडांचा सांभाळ केला, लग्नाला पुढाकार देखील त्यांनीच घेतला. सागराची अथांगता, सुर्याचे तेज, चंद्राची शितलता, पाण्याची निर्मळता, वृक्षाची सावली, कस्तूरीचा सुगंध आणि अमृताची गोडी म्हणजे रमाई. आई ही व्यक्ति असते, त्यापेक्षाही एक वृत्ती असते. आश्वस्त करणारी शक्ति असते, तिच्यात पुण्यसंचय आणि अध्यात्मकता ठासून भरलेली असते. सोसण्याने माणूस खंगत नाही. खचत नाही आणि कणखर बनतो. आपल्या सहनसीमेचा अंदाज आपल्यालाच नसतो. त्या दु:खाचा आवंढा गिळत होत्या पण कधीच हतबल, हताश, हिरमुसल्या नाहीत. इतक्या सोज्वळ व शांत स्वाभावाच्या रमाई होत्या. इतकी करारी बान्याची माता आजवर बघण्यात आलीच नाही. संवेदनाचा ओलावा हेच नात्याचं बलस्थान असते, हे आपणांस रमाईत आढळते.

भीम आम्हा शेषितांच्या मायेचा पदर
तू त्या पदराची सोनेरी किनार गं रमाई !
भीम वणवा जुल्मी व्यवस्था जाळणारा
तू त्या वणव्याची ठिणगी गं रमाई
भीम जरी जगी ओळख भारताची
तुझ्या वीणा भीम अधुरा गं रमाई !

अत्यंत हालाकीचे दिवस काढणारी माता रमाईने अनेक निधन जवळून बघितले. प्रत्येक निधनाने ती ही थोडी-थोडी मेल्यागत पण त्या खचल्या नाहीत, बेडर झाल्यात. मरण म्हणजे काय ? कळत नव्हते, त्या बाल वयात आई वडिलांचा मृत्यू. १९१३ साली रामजी सुभेदारांचा मृत्यू, १९१४ ते १९१७ दरम्यान रमेशचा मृत्यू, बाबांच्या सावत्र आई जिजाबाईंचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू, बाबांसाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. १९२१ ला बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर व १९२६ मध्ये राजरत्नचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहचू दिली नाही. पती परदेशात शिक्षणासाठी गेले, रमाई एकट्या पडल्या. घर चालविण्यासाठी तिने शेण गोवऱ्या, सरपणासाठी वणवण फिरल्या. पोयबावाडीतून दादर माहीम पर्यंत जात असत बॅरिस्टराची पत्नी शेण वेचते म्हणून लोकं नावे ठेवतील, या भितीने त्या पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री ८ नंतर गोवऱ्या थापायला वरळीला जात असंत, मुलांसाठी उपास करत असंत. बाबासाहेबांशिवाय दुसरा कूणीच पाठराखा नव्हता, त्यामुळेच त्यांना उपरोक्त उपक्रम करावाच लागला. पोटाची खडगी भरणे गरजेचं होतं. दोन वेळचं जेवन सुध्दा नशीबी नव्हतं. इतके कष्ट रमाईने सोसले. त्याची आच मुलांना सुध्दा लागू दिली नाही. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पहावले नाहीत. त्यांनी काही पैसे जमा केले. व ते पैसै रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दुःखांशी अडचणींशी गरिबीशी भांडत होती, तरी पण त्या खचल्या नाहीत. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई!

बाबासाहेब आणि रमाई दादरच्या राजगृह बंगल्यावर राहत होते. त्यावेळी एकदा अचानक बाबासाहेबांना परदेशी काही कामा निमित्त जायचे होते, पण रमाईला एकटी घरामध्ये कसे ठेवायचे म्हणून बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे मित्राकडे रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. वराळे काका धारवाड मध्ये लहान मुलांचे वस्तीगृह चालवत असत. त्या वस्तीगृहाच्या आवारात अनेक लहान मुले खेळायला येत असत. एकदा अचानक दोन दिवस ती लहान मुले खेळायलाच आली नाही. म्हणून रमाईनी वराळे काकांना विचारले, दोन दिवस झाली ही मुले कुठे गेली आहेत खेळायला आवारात कां आली नाही. त्यावेळी वराळे म्हणाले, ती लहान मुले दोन दिवसापासून उपाशी आहेत. कारण वस्तीगृहाला जे अन्नधान्याचे अनुदान महिन्याला मिळायचे ते अजून मिळालेले नाही. ते मिळायला अजून तीन दिवस लागतील. अजून तीन दिवस ही मुले उपाशीच राहणार आहेत. त्यामुळे ती खेळायला बाहेर आली नाहीत. ते रमाईला कंठ दाटून सांगत असतांना, रमाई लगेच आपल्या खोली मध्ये गेल्या आणि रडत बसल्या त्यांनाही ते दु:ख सोसावेना. कपाटातला सोनं ठेवलेला डबा आणि आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून वराळे यांच्याकडे देऊन म्हणाल्या, तुम्ही ह्या बांगड्या आणि डबा ताबडतोब विकून किंवा गहान ठेवून ह्या लहान मुलांसाठी खाण्याच्या वस्तू घेऊन या. मी अजून तीन दिवस ही लहान मुले उपाशी नाही पाहू शकत. त्यावेळी वराळे त्या बांगड्या आणि डबा घेऊन जातात आणि लहान मुलांसाठी जेवणाच्या वस्तू घेऊन येतात, लहान मुले त्यावेळी पोटभरून जेवण झाल्यावर. खूप आनंदी असतात. हे पाहून रमाई देखील आनंदी झाल्या. त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला, मन गहिवरुन आलं. सगळी लहान मुले रमाबाई यांना रमाआई म्हणून नाचू बागडू लागली. आणि त्या क्षणा पासून रमाबाई ही माता रमाई झाली. आणि ती सगळ्यांची आई झाली.



ख्यातनाम गायक, मिलिंद शिंदे म्हणतात,
भुकेल्या मुलांची दशा पाहुनी, भुकेल्या मुलांची दशा पाहुनी,
बांगड्या सोन्याच्या रमानं दिल्या काढुनी.. धन्य रमाई । धन्य रमाई ।

अस्पृश्यतेच्या अग्निदिव्यातून होरपळून निघालेले बाबासाहेब आता समाजाला अस्पृश्यतेच्या रोगातून मुक्त करण्यासाठी व त्यासाठी निष्णात डॉक्टर होण्यासाठी अपार कष्ट घेऊ लागले. अर्धपोटी उपाशी राहून १८-१८ तास अभ्यास करु लागले. त्याच वेळी रमाईने आपल्या निष्ठेने, त्यागाने आणि कष्टाने स्वतःच्या संसाराचा गाडा हाकलून बाबासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी मदत करत होती. डॉ. बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले असता, त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज व त्यांना मानणारा चाहता वर्ग मुंबई बंदरात आला. साहेबांचे स्वागत बघण्यासाठी माईला सुध्दा जायचे होते. परंतू, नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती तेव्हा त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या सत्कारप्रसंगी दिलेला भरजरी फेटा नेसून बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या. ते बोटीतून उतरताच जनासागर उफाळून आला, त्यांच्या जयजयकाराने बंदर दुमदुमून गेले. अनेकजण त्यांना भेटत होते, हस्तांदोलन करीत होते. पण रमाई मात्र लांब कोपऱ्यात उभी दिसताच, बाबासाहेबांची नजर त्यांच्या रामूवर गेली, ते जवळ गेले. त्यांनी विचारले, रामू ! तू लांब का उभी राहीलीस'? रमाई म्हणाली, तुम्हाला भेटण्यासाठी सारा समाज आतूर झाला असतांना मी तुम्हाला आधी भेटणे योग्य नव्हते, म्हणुन तर मी अशी लांब उभी आहे, शेवटी, मी तर तूमची पत्नीच आहे. मी तुम्हांस कधीही भेटू शकते.

रमाईंनी अठ्ठावीस वर्षे बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययनात व्यत्यय येऊ नये म्हणून त्या राजगृहाच्या प्रवेशद्वारावर तासनतास बसून राहायच्या. बाबासाहेबांना कोणी भेटायला आल्यावार त्यांच्याशी तितक्याच अदबीने वागत, साहेब पुस्तकाच्या कोंडाळ्यात आहेत, नंतर भेटा. असे म्हणत. आलेल्याची रवानगी करताना त्याचे नाव, गाव, कामाचे स्वरूप, पुन्हा कधी येणार आहात, हे सारे एका नोंदवहीत टिपण्यास सांगत, इतकी ती त्यांना जोपासत होती. हळवं मन मितभाषी अत्यंत स्वाभिमानी अशा रमाई होत्या. साहेबांसाठी जिवाचं रान करणारी रमाई त्यांना कसलीही इजा होणार नाही यासाठी धडपडणारी रमाई !

रमाईचं शरीर काबाड कष्टाने पोखरून खंगुन गेलं होतं, रमाईचा आजार बळावला होता. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. पण अंगात त्राण नसल्यामुळे त्या बोलू शकत नव्हत्या. बाबासाहेबांच्या आग्रहामुळे रमाई थोडी कॉफी किंवा मोसंबीचा रस पीत असत. त्यांचा आजार काही केल्या बरा होत नव्हता. बाबासाहेबांना दुःख अनावर होत होतं. अस्वस्थपणा जाणवत होता, ते काहीच बोलू शकत नव्हते, निमूटपणे रमाई कडे बघत होते. दादरच्या राजगृहासमोर लाखो लोक जमले होते. यशवंताबरोबर दीनांना पोरका करणारा दिवस उजाडला. २७ मे १९३५ रोजी सकाळी ९ वाजता रमाईची प्राण ज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाला. कोट्यवधी रंजल्या गांजल्याची रमाई माता त्यांना अंतरली होती. दुपारी २ वाजता रमाईची प्रेतयात्रा वरळी स्मशानाकडे निघाली. आम्हा दुरावली मायेची सावुली. निर्वाण पावली आमची रमाई माऊली. पहाडासारखे बाबासाहेब ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षांच्या संसारात प्रेमाने व धैर्याने भक्कम सोबत देणाऱ्या रमाबाई मध्येच अचानक सोडून न परतीच्या वाटेने कायमच्या दूर निघून गेल्या त्यामुळे बाबासाहेब आपल्या संसारात अगदी एकाकी पडले.

बाबासाहेब आंबेडकरांचे रमाबाईवर निस्सीम प्रेम होते. तिचे कष्ट पाहून त्यांचे मन तुटायचे. त्यांनी आपल्या रामूला पाठवलेल्या पत्रात त्यांच्या या भावना प्रतिबिंबित व्हायच्या. 'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा आपला ग्रंथ बाबासाहेबांनी आपल्या 'प्रिय रामू' ला अर्पण केला. अर्पणपत्रिकेत बाबासाहेबांनी लिहिले आहे की, ''तिच्या हृदयाचा चांगुलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्यनी माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसांत तिने मला दाखविली- जेव्हा मी नशिबाने लादलेला मित्रविरहित काळ चिंतेसह कंठीत होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या रामूच्या आठवणींत कोरलेले हे प्रतीक...'' आपल्या पत्नीबद्दलच्या भावना बाबासाहेबांच्या या अर्पणपत्रिकेतून व्यक्त झाल्या आहेत. आजच्या दिनी त्यागमूर्ती माता रमाईच्या १२७ व्या जयंती निमीत्त विनम्र अभिवादन !

*******

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीदिना निमित्य नांदन नांदन होत रमाच नांदन महिलांचे प्रेरणा गीत.

नांदन नांदन होत रमाच नांदन,भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण हे आज महिलांचे प्रेरणा गीत झाले आहे.गीतकार प्रकाश पवार यांनी लिहलेल हे गीत आनंद शिंदे यांनी गायलेलं व हर्षद शिंदे यांनी स्वरबद्ध केलेले गीत आज घराघरात आवर्जून वाजत असते. प्रत्येक महिलांच्या तोंडी ह्या दोनतीन ओळी हमखास असतात. घरगुती लग्न सोहळा असो कि जाहीर सभा कोणताही कार्यकम असो त्याठिकाणी हे गीत हमखास लावल्या जाते.ते सर्वांचेच आकर्षण असते.त्याची शब्द रचनाच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संसाराचे चित्र डोळ्या समोर उभे करते. त्यामुळेच कष्टकरी महिलांना हे गीत कायम प्रेरणादायी असते.या गीताला आज पर्यंत युट्यूबला ६ फेब्रुवारी २०२२ पासून आज पर्यंत २७ लाख लोकांनी हे गीत लाईक केले आहे.तर (४.८७.७६,७२७.) ४ करोड ८७ लाख ७६ हजार ७२७ लोकांनी ते गीत पहिले आहे.हे गीत आनंद शिंदे यांनी ते गायिल्या मुळेच अजरामर झाले आहे. कडूबाई खरात सह डी जे च्या तालावर आता युट्युब वर अनेक गायकांनी ते परत परत गाऊन लाखो लोकांना गुणगुणायला व शरीर हलव्याला मजबूर करते.राज्यातील अनेक गायकांनी ते गायिले आहे.सर्व महिला वर्गात ते लोकप्रिय झाले आहे.

नांदन नांदन होत रमाच नांदन
नांदन नांदन होत रमाच नांदन
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
नांदन नांदन होत रमाच नांदन
अग नांदन नांदन होत रमाच नांदन
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
धनी असता मुलखातीरी
पार पाडी कर्तव्य सारी
धनी असता मुलखातीरी
पार पाडी कर्तव्य सारी
पाणी श्रमान शेंदन असं रमाच नांदन
पाणी श्रमान शेंदन असं रमाच नांदन
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
नव्हती गरीबी तीजला नवी
होती परिचित माहेर गावी
नव्हती गरीबी तीजला नवी
होती परिचित माहेर गावी
कंबर कसून बांधन असं रमाच नांदन
कंबर कसून बांधन असं रमाच नांदन
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
कण्या शिजवून सांजेला नटवी
पाणी डोळ्याला लावुन पोर उठली
कण्या शिजवून सांजेला नटवी
पाणी डोळ्याला लावुन पोर उठली
कोंड्या मांड्याच रांदन असं रमाच नांदन
कोंड्या मांड्याच रांदन असं रमाच नांदन
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
होती कष्टाच जीवन जगत
सुख प्रकाश भावी बघत
होती कष्टाच जीवन जगत
सुख प्रकाश भावी बघत
नाव अंतरी गोंदण असं रमाच नांदन
नाव अंतरी गोंदण असं रमाच नांदन
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
नांदन नांदन होत रमाच नांदन
अग नांदन नांदन होत रमाच नांदन
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण
भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण

नांदन नांदन होत रमाच नांदन महिलांचे प्रेरणा गीतामधून कष्टकरी महिलांनी प्रेरणा घेतली आहे.म्हणूनच कष्टकारी महिला नेहमी आपल्या घरातील कर्त्या पुरुषाला सर्वच कामात सतत मदत करीत असतात अशा महिलांचे प्रेरणा स्थान म्हणजे माता रमाई आहेत. माता रमाई बाबत आज प्रयन्त अनेक प्रकारचे लिखाण हे भावनिकच झाले आहे.रमाबाईच्या कष्ट त्यागाला भावनिक केल्या गेले आहे. भिमराव आंबेडकर यांना जी साथ मिळाली ती भावनिक कधीच नव्हती ती पतीच्या कर्तव्य दक्षतेला मना पासुन पत्नीची साथ होती.ती प्रेरणा खेडया पड्यातील व शहरातील झोपड़पट्टीत राहणाऱ्या कार्यकर्त्याच्या पत्नीनी घेतली म्हणुन ते आंबेडकर चळवळीतील प्रत्येक जन आंदोलनात पति पत्नी सहभागी होतात.विशेष ते सर्वच असंघटित कामगार असतात.पण असंघटित कामगार म्हणुन ते कोणतेही आंदोलन करीत नाही.त्याची त्यांना जाणीव नाही. रमाबाई आणि भिमरावचे सर्व नातलग कोणते कामगार होते?.तो इतिहास डोळ्यासमोर ठेवून शिक्षणाला महत्व देऊन संघटीत झाले पाहिजे.

रमाबाई बदल जेवढा आदर अडानी असंघटित महिला करतात,तेवढा सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणाऱ्या आणि सुरक्षित ठिकाणी राहणाऱ्या महिला करत नाही. अशा महिला आपल्या पतीला बिनपगारी कोणतेही काम करू देत नाही.(देत असतील अशा त्या महिलांचे हार्दिक अभिनंदन आणि त्यांची माफी सुद्धा ) आज प्रयन्तचा इतिहास आणि अनुभवा वरुन हे मी लिहतो. अन्यता आंबेडकर चळवळीत आज जी लेटरहेड वर जागणाऱ्याची जी संख्या आहे.ती राहली नसती. प्रत्येक यशस्वी पुरुषा मागे एका महिलाचा हात असतो तसाच एका अपयशस्वी पुरुषा मागे एका महिलांचा हात असतो.मग घराघरत असलेल्या आंबेडकर चळवळीतील गटागटच्या नेत्यांच्या महिलाचे प्रेरणा स्थान कोणते?. नांदन नांदन होत रमाच नांदन,भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण हा आदर्श असू शकत नाही.



रमाबाई ह्या बाबासाहेब याच्या प्रत्येक आंदोलनात मनाने सहभागी होत्या पण शरीराने नाही.मुलगा आजारी आहे घरात पैसा अदला नाही.नवरा तिकडे समाजसेवा करतो.असे सहन करणारी महिला आज शोधून सापडणार नाही.त्या आजारात मुलगा मरण पावतो तरी ती महिला विचलीत होवुन नवरया बदल राईचा पर्वत बनवित नाही.परिस्थिती समजुन घेते.याला भावनिक मुद्दा कसा म्हणता येईल?.हा समंजस पणा, दूरदृष्टिपणा होता. त्याला दुरदुष्टी म्हणता येईल.हा संदेश आज महिलांनी घेणे गरजेचा आहे.आज समाज ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत त्याचे (बाबासाहेबाचे) कुटुंब आहे.त्याकाळी बाबासाहेब आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलावी यासाठी शिकत नव्हते तर समाजाची एकूण सर्व परिस्थिती बदलण्या करीता शिकत होते. हे माता रमाबाई समजू शकत होती. आजची एकही माता असा विचार करणारी दिसणार नाही. रमाबाई वर असे प्रसंग किती वेळा आले.संपूर्ण देश बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात होता.पुणे करार हा महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या राजकीय नेत्यांमध्ये २४ सप्टेंबर १९३२ रोजी झाला. त्यापूर्वी गांधी पुण्याला उपोषणाला बसले तेव्हा ते त्यात मरणार अशी परिस्थिती देशभरात निर्माण झाली होत. त्याचा संपूर्ण राग माझ्या समाजावर निघणार याची कल्पना बाबासाहेब यांना होती.पण रमाबाईची मानसिक परिस्थिती काय असेल.घरात आणि बाहेर होणाऱ्या चर्चा पेपरात येणारया बातम्या रमाबाईला अस्वस्थ करीत होत्या. पण काय वर्णन करून ठेवले आल्या थोर विचारवंतांनी??

रमाबाईचे पतीनिष्ठ उदाहरण द्रुष्टी समोर ठेवून बाबासाहेब नेहमी जाहीरपणे सांगत असत. स्त्री हा समाजाचा अलंकार आहे.आपल्या कुटुंबाचे आणि कुळाचा नांव लैकिक स्त्रियाच्या शिलावरच अवलबून असतो. स्त्री हि जशी गृहिणी तशी सुसंस्कारित समाज निर्माण करणारी माता ही असते. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैवाहिक जीवनात सुरवात पासून शेवट प्रयन्त रमाबाईनी हाल अपेष्ट,दुख गरिबी यांच्याशी सतत संघर्ष करीत राहिल्या त्यामुळे त्या नेहमी आजारी राहत होत्या पण त्यांनी बाबासाहेबाकडे तक्रार केली नाही.म्हणूनच नांदन नांदन होत रमाच नांदन,भिमाच्या संसारी जस टिपुर चांदण असे वर्णन गीतकार करतात. त्यांचा जन्म कुठे झाल.आईवडील काय करीत होते त्यांच्या दुखाचे वर्णन करण्यापेक्षा त्यांच्या त्याग,कष्टाची नोंद घेतली पाहिजे. तोच आदर्श महिलांनी डोळ्यासमोर ठेवला पाहिजे.रमाबाई भीमराव आंबेडकर यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८,आणि मृत्यू २७ मे १९३५ झाला. रमाबाई ह्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत्या.२७ मे १९३५ ला त्यांचे दुखद निधन झाले. अशा त्यागमूर्ती रमाईच्या १२७ व्या जयंतीदिना निमित्य त्यांच्या त्याग,कष्टाला कोटी कोटी प्रणाम.

********

सागर रामभाऊ तायडे,
९९२०४०३८५९,
भांडूप,मुंबई.

# जीवनशैली निवडीचा स्तनाच्या कर्करोगावर होणारा प्रभाव, काय सांगतात तज्ज्ञ

जगभरातील महिलांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात आढळून येणाऱ्या कर्करोग प्रकारांपैकी एक आहे स्तनाचा कर्करोग. हा आजार होण्यामागे जेनेटिक कारणे तर असतातच, शिवाय जीवनशैली कशाप्रकारची आहे ते देखील याचा धोका कमी किंवा जास्त करण्यामध्ये खूप महत्त्वाचे ठरते. रोजचा आहार, व्यायाम आणि नियमित तपासण्या याबाबतीत नीट काळजी घेऊन स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी करता येतो. जीवनशैलीमध्ये काही महत्त्वाचे बदल करून स्तनाच्या कर्करोगाला आळा घालता येणे शक्य आहे, डॉ. तुषार जाधव, कन्सल्टन्ट, सर्जिकल ऑन्कोलॉजी, कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे.

योग्य आहार


स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यात पुरेसा आहार अत्यावश्यक आहे. प्रक्रिया करण्यात आलेले खाद्यपदार्थ, लाल मांस यांचे सेवन कमीत कमी करून आणि ताजी फळे, भाज्या व संपूर्ण धान्ये यांचे रोजच्या आहारातील प्रमाण जास्तीत जास्त ठेवून तुम्ही तुमच्या शरीराला अशी अँटीऑक्सिडंट्स व पोषकद्रव्ये पुरवू शकाल, जी पेशींचे नुकसान होण्यापासून रक्षण करतात. हे खाद्यपदार्थ हार्मोन्स लेव्हल नियंत्रित करण्यात मदत करतात, ज्यामुळे कर्करोगजन्य वाढ रोखता येते. ट्रान्स फॅट्स आणि सॅच्युरेटेड फॅट्स यांच्याऐवजी दाणे, बिया आणि ऑलिव्ह तेल यामधील आरोग्याला पूरक फॅट्सची निवड करून तुम्ही एकंदरीत आरोग्य चांगले राखू शकाल.


सक्रिय रहा

स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यासाठी नियमितपणे शारीरिक हालचाली करत राहणे अत्यावश्यक आहे. एका आठवड्याभरात जवळपास १५० मिनिटे मध्यम व्यायाम करा, यासाठी चालणे, पोहणे किंवा सायकलिंग देखील करता येईल. असे केल्याने हार्मोन्स व्यवस्थित राहतात, रोगप्रतिकार शक्ती वाढते आणि वजन नियंत्रणात राहते. व्यायाम केल्याने तुमचे संपूर्ण आरोग्य चांगले राहते, शरीरातील सूज, दाह आणि इन्श्युलिन रेसिस्टन्स कमी होतो, आणि कर्करोग होण्याचा धोका कमी होतो.

वजन नियंत्रणात ठेवा

रजोनिवृत्तीनंतर स्थूलपणा हा स्तनाच्या कर्करोगाचा धोका निर्माण करणारा एक घटक आहे, त्याबरोबरीनेच भरपूर चरबी असलेले टिश्यू एस्ट्रोजेन लेव्हल वाढवतात, त्यामुळे स्तनाच्या कर्करोगाच्या हार्मोन-सेन्सिटिव्ह पेशींच्या वाढीला पूरक वातावरण तयार होते. संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्यासह वजन नियंत्रणात ठेवून हार्मोन लेव्हल स्थिर ठेवण्यात मदत मिळते, शरीरातील सूज आणि दाह कमी होतो, परिणामी कर्करोगाचा धोका कमी होतो.





अल्कोहोल सेवनावर मर्यादा

अल्कोहोल सेवन आणि स्तनाच्या कर्करोगाचा धोका यांच्यात थेट संबंध असतो. अगदी कमी प्रमाणात जरी अल्कोहोल सेवन केले तरी शरीरात एस्ट्रोजेन लेव्हल वाढतात, त्यामुळे धोका उत्पन्न होऊ शकतो. अल्कोहोल सेवन करण्याची इच्छा असणाऱ्या महिलांनी दर दिवशी फक्त एकच ड्रिंक इतपत मर्यादा घालून घेणे अत्यावश्यक आहे. अल्कोहोलच्या ऐवजी नॉन-अल्कोहोलिक पेये जसे की, हर्बल टी किंवा फ्लेवर्ड वॉटर यांची देखील निवड तुम्ही करू शकता.

धूम्रपान टाळा, तंबाखू सेवन अजिबात करू नका

धुम्रपानामुळे अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या कर्करोगाचा धोका उद्भवू शकतो, स्तनाच्या कर्करोगाचा देखील त्यामध्ये समावेश आहे. प्री-मेनोपॉज टप्प्यामध्ये असलेल्या, धूम्रपान करणाऱ्या महिलांना स्तनाच्या कर्करोगाचा धोका सर्वात जास्त असतो, कारण धुम्रपानामुळे हानिकारक कार्सिनोजेन आणि कार्बनयुक्त कण शरीरात जातात, त्यामुळे डीएनएचे नुकसान होते आणि ट्युमर वाढीला चालना मिळते. धूम्रपान बंद केल्यास स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी होतो आणि फुफ्फुसे व हृदयाचे आरोग्य सुधारते.

बाळाला दीर्घकाळपर्यंत स्तनपान

संशोधन आणि अभ्यासातून असे आढळून आले आहे की, बाळाला दीर्घकाळपर्यंत स्तनपान करवल्यामुळे स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी होऊ शकतो. स्तनपान करवल्यामुळे हार्मोन्स अड्जस्ट होतात आणि एस्ट्रोजेनचा धोका कमी होतो, परिणामी, हार्मोन-सेन्सिटिव्ह स्तनाच्या कर्करोगाची वाढ रोखली जाऊ शकते. एखादी महिला सहा महिन्यांहून जास्त काळपर्यंत स्तनपान करवू शकत असेल तर तिला अजून जास्त लाभ मिळू शकतील.

हार्मोन थेरपीच्या बाबतीत सावध रहा

रजोनिवृत्तीवरील उपचार म्हणून सुचवली जाणारी हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी स्तनाच्या कर्करोगाचा धोका वाढवू शकते. कम्बाइन्ड एस्ट्रोजेन-प्रोगेस्टेरॉन थेरपी हार्मोन लेव्हल वाढवते, त्यामुळे कर्करोगाच्या वाढीला चालना मिळू शकते. हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी करवून घेत असलेल्या महिलांनी आपल्या डॉक्टरांसोबत इतर पर्यायांविषयी चर्चा केली पाहिजे किंवा अत्यावश्यक असेल तरच कमीत कमी काळासाठी कमीत कमी डोस घ्यावा.

नियमितपणे तपासणी करून घ्यावी


आजार लवकरात लवकर लक्षात येणे खूप महत्त्वाचे आहे. आजार लवकरात लवकर लक्षात आल्यास स्तनाच्या कर्करोगावरील उपचारांचे चांगले परिणाम मिळण्याची शक्यता वाढते. स्वतः स्वतःची तपासणी करून, क्लिनिकल ब्रेस्ट एक्झामिनेशन आणि मॅमोग्राम करून, डॉक्टरांना स्तनामध्ये काही असामान्य बदल, वाढ होत असल्यास खूप आधीच लक्षात येऊ शकते आणि उपचारांचे अधिक चांगले परिणाम मिळू शकतात. ४० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या महिलांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मॅमोग्राम करून घ्यावा आणि ४० पेक्षा कमी वयाच्या महिलांनी स्तनांमध्ये काही असामान्य बदल होत आहेत का याची स्वतःच नियमितपणे तपासणी करत राहावी.

गंभीर समस्या

स्तनाचा कर्करोग ही संपूर्ण जगभरातील एक गंभीर आरोग्य समस्या आहे पण जीवनशैलीमध्ये सकारात्मक बदल, निवड करून या आजाराचा धोका लक्षणीय प्रमाणात कमी करणे सहजशक्य आहे. संतुलित आहार घेणे, शारीरिक व्यायाम करणे, वजन नियंत्रणात ठेवणे आणि तंबाखू, अतिरिक्त अल्कोहोल सेवन टाळणे हे सर्व करून तुम्ही आजाराला प्रतिबंध घालू शकता. स्तनपान करवणे, हार्मोन थेरपी व्यवस्थापित करून आणि मल्टीडिसिप्लिनरी दृष्टिकोन असणाऱ्या हॉस्पिटलमध्ये नियमितपणे तपासणी करून आजार लवकरात लवकर लक्षात येऊ शकतो, परिणामी धोका कमी होऊ शकतो. या सर्व आरोग्यदायी सवयींचा अवलंब करून महिला स्वतःच्या आरोग्याविषयी जागरूक व सक्रिय होऊन स्तनाच्या कर्करोगाचा धोका टाळू शकतात.

## केसांमध्ये वाढलेला कोंडा कमी करण्यासाठी जावेद हबीबने सांगितलेला हेअर मास्क नक्की करा ट्राय, केस होतील मजबूत

थंडीच्या दिवसांमध्ये वातावरणातील आद्रतेचा परिणाम त्वचेसोबत केसांवर सुद्धा दिसून येतो. या दिवसांमध्ये केसांमध्ये कोंडा होणे, केस गळणे, केस तुटणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. केसांना योग्य पोषण न मिळाल्यामुळे केसांसंबधित समस्या उद्भवतात. अशावेळी अनेक महिला बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या प्रोटीन ट्रीटमेंट करतात. मात्र या प्रोटीन ट्रीटमेंट फारकाळ केसांवर टिकून राहत नाही. त्यामुळे केसांना वरून पोषण देण्याऐवजी आतून पोषण देणे आवश्यक आहे. केसांच्या वाढीसाठी आहारात हिरव्या पालेभाज्या, सुका मेवा, कॅल्शियम युक्त पदार्थ इत्यादी पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. वातावरणात होणाऱ्या बदलांचा परिणाम केसांवर लगेच दिसून येतो. केसांमध्ये कोंडा झाल्यानंतर टाळूवर सतत खाज येऊ लागते. ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर केस गळतात. याशिवाय टाळू पूर्णपणे रखरखीत होऊन जाते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सेलिब्रिटी हेअर केअर एक्सपर्ट जावेद हबीब यांनी केसांसंबधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी घरगुती हेअर मास्क तयार करण्याची सोपी कृती सांगितली आहे. यामुळे तुमच्या टाळूवरील कोंडा कमी होईल आणि केसगळतीच्या समस्यांपासून आराम मिळण्यास मदत होईल. या हेअर मास्कचा वापर केल्यामुळे केस मजबूत राहून कोंडा कमी होतो. हेअर मास्क तयार करण्याची कृती: हेअर मास्क तयार करण्यासाठी सर्वप्रथम, वाटीमध्ये आल्याचा रस घेऊन त्यात खोबऱ्याचे तेल मिक्स करा. त्यानंतर तयार केलेले मिश्रण व्यवस्थित मिक्स करून घ्या. नंतर केसांचे दोन भाग करून केसांच्या मुळांपासून ते टोकांपर्यंत संपूर्ण केसांवर तयार केलेला घरगुती हेअरमास्क लावून केस १० ते १५ मिनिटं हलक्या हाताने मसाज करून घ्या. मसाज करून झाल्यानंतर काहीवेळ केस तसेच ठेवा. नंतर पाण्याने केस स्वच्छ धुवून घ्या. हा उपाय आठवड्यातून दोन वेळा केल्यास केसांची वाढ निरोगी होईल आणि केसांचे गळणे थांबेल. खोबऱ्याचे तेल केसांना लावण्याचे फायदे: पूर्वीच्या काळापासून खोबऱ्याच्या तेलाचा वापर जेवणासोबतच केसांच्या वाढीसाठी सुद्धा केला जात आहे. खोबऱ्याच्या तेलाने केसांमध्ये मसाज केल्यास टाळूवरील रक्तभिसरण सुधारण्यास मदत होईल. यामुळे केस तुटणार नाही. आल्यामध्ये असलेल्या गुणधर्मांमुळे केसांना पोषण मिळते आणि केस मजबूत होतात. आल्यामध्ये अँटीफंगल, अँटीबॅक्टेरिअल गुणधर्म आढळून येतात, ज्यामुळे टाळूवरील इन्फेक्शनचा धोका कमी होतो. कोंडा कमी करण्यासाठी खोबऱ्याच्या तेलात तुम्ही आल्याची पावडर सुद्धा मिक्स करून लावू शकता.



# भारताला ‘कॅन्सर कॅपिटल ऑफ द वर्ल्ड’ का म्हटले जाते? तज्ज्ञांकडून जाणून घ्या कारण

भारतीयांच्या आरोग्यासंदर्भात एका नवीन अभ्यासात चिंताजनक गोष्ट स्पष्ट झाली आहे. देशभरात कर्करोगाची प्रकरणे वाढत आहेत. परिणामी, असंसर्गजन्य रोगांचे (छउऊ) प्रमाणही वाढत आहे. अपोलो हॉस्पिटल्सने प्रसिद्ध केलेल्या अहवालात भारताचं वर्णन ‘कॅन्सर कॅपिटल ऑफ द वर्ल्ड’ असं केलं आहे. भारताला ‘कॅन्सर कॅपिटल ऑफ द वर्ल्ड’ का म्हटले जात आहे? याबाबत तज्ज्ञांची मतं काय आहेत हे जाणून घेऊ या.



आकडेवारीनुसार, एक तृतीयांश भारतीय प्री-डायबिटीज आहेत, दोन तृतीयांश प्री-हायपरटेन्सिव्ह आहेत आणि दहापैकी एक नैराश्याचा सामना करत आहे. कर्करोग, मधुमेह, हृदयविकार आणि मानसिक आरोग्य समस्यांसह या दीर्घकालीन आजारांची स्थिती गंभीर पातळीवर पोहोचत आहेत आणि देशातील लोकांच्या आरोग्यावर लक्षणीय परिणाम करत आहेत.

विशेष चिंतेची बाब म्हणजे कर्करोगाच्या प्रकरणांची वाढती संख्या ही जागतिक सरासरीपेक्षा जास्त आहे. प्री-डायबेटिस, प्री-हायपरटेन्शन आणि मानसिक आरोग्य विकारांचे निदान तरुण वयोगटांमध्ये होत असल्याने संभाव्य आरोग्यविषयक संकटाचा इशाराही अहवालात दिला आहे.

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि नॅशनल सेंटर फॉर डिसीज इन्फॉर्मेटिक्स अँड रिसर्च च्या मते, गेल्या काही वर्षांपासून भारतात कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल्सच्या मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट आणि हेमॅटो-ऑन्कॉलॉजिस्ट विभागाचे वरिष्ठ सल्लागार आणि मेडिकल ऑन्कोलॉजी विभागाचे संचालक डॉक्टर निखिल एस. घड्याळपाटील यांनी द इंडियन एक्स्प्रेसला याबाबत माहिती देताना सांगितले की, या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सरकारी संस्था, आरोग्य सेवा पुरवणारे, स्वयंसेवी संस्था (एनजीओ) संशोधक आणि समुदाय यासह विविध घटकांचा समावेश असलेल्या बहुआयामी दृष्टिकोनाची आवश्यकता आहे.

कर्करोगाचे प्रमाण वाढण्याचे काय आहे कारण?

तंबाखू, धूम्रपान करणे आणि कर्करोगजन्य पदार्थांच्या संपर्कात येणे

विविध जीवनशैली आत्मसात करणे, पर्यावरणीय, सामाजिक आर्थिक आव्हाने, भारतात कर्करोगाचे प्रमाण वाढण्याला कारणीभूत ठरतात. तंबाखूचा सर्रास वापर, धूम्रपान अशा दोन्ही प्रकारांमुळे फुफ्फुसाचा, तोंडाचा आणि घशाचा कर्करोग होण्याचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. शिवाय, वाहने आणि उद्योगांमधून होणारे वायू प्रदूषण लोकसंख्येच्या मोठ्या भागाला कर्करोगजन्य पदार्थांच्या संपर्कात आणते, ज्यामुळे विविध कर्करोगांचा धोका वाढतो आहे, असे डॉ. चिन्नाबाबू सुंकवल्ली यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना स्पष्ट केले. डॉ. सुंकवल्ली हे हैदराबादच्या यशोदा हॉस्पिटल्स सर्जिकल ऑन्कोलॉजी आणि रोबोटिक सर्जिकल ऑन्कोलॉजी विभागाचे वरिष्ठ सल्लागार आणि सर्जिकल ऑन्कोलॉजी विभागाचे क्लिनिकल संचालक आहेत. बदलती जीवनशैली त्याच विभागातील ज्येष्ठ कर्करोगतज्ज्ञ आणि रोबोटिक सर्जन डॉ. सचिन मर्दा यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना आरोग्यासाठी हानिकार आहाराच्या सवयींवर भर दिला. प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचे सेवन करणे आणि शारीरिक हालचाल किंवा व्यायामाचे प्रमाण कमी होण्यामुळे लठ्ठपणाचे प्रमाण वाढते आहे, ज्याचा स्तन, कोलोरेक्टल आणि एंडोमेट्रियल कर्करोगाशी संबंध असल्याचे अनेक प्रकरणांमध्ये समोर आले आहे. कर्करोगाचे लवकर निदान करण्याची संधी गमावणे कर्करोगाच्या लक्षणांबद्दल जागरूकता नसणे आणि व्यापक प्रमाणात स्क्रीनिंग प्रोग्रामच्या अभावामुळे कर्करोगाचे लवकर निदान होत नाही. याचा परिणाम बहुतेक वेळा कर्करोगाचे शेवटच्या टप्प्यामध्ये निदान होते, ज्यामुळे यशस्वी उपचारांची शक्यता लक्षणीयरीत्या कमी होते. विशेषत: ग्रामीण भागात जिथे दर्जेदार आरोग्य सेवा मर्यादित आहे. हैदराबाद केअर हॉस्पिटल्सचे सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट आणि रोबोटिक सर्जन विभागाचे सल्लागार, डॉ. नरेन बोलिनेनी यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना कर्करोगाचे लवकर निदान न होण्याच्या प्रभावावर भर दिला.

# जिल्ह्यातील इयत्ता बारावी परीक्षा केंद्रांवर ‘सीसीटीव्ही’ची नजर !

## गैरप्रकार करणाऱ्या शिक्षक, शाळा, विद्यालयांवर होणार कारवाई

लातूर :- इयत्ता बारावीची परीक्षा होत असलेल्या जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावरील सर्व वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत. या सीसीटीव्ही कॅमेराद्वारे प्रत्येक परीक्षा केंद्रावर प्रशासनाची करडी नजर राहणार असून या परीक्षा केंद्रांचे दैनंदिन चित्रीकरण त्याच दिवशी संबंधित तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच परीक्षा काळात कोणत्याही शाळा, विद्यालयाचे शिक्षक अथवा कर्मचारी गैरप्रकार करताना आढळल्यास त्यांच्यावर कठोर कार्यवाही करून संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी यांनी दिला आहे. इयत्ता बारावी परीक्षेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी यावेळी उपस्थित होते. जिल्ह्यातील १०० परीक्षा केंद्रांवर ११ फेब्रुवारी २०२५ पासून इयत्ता बारावीच्या परीक्षा सुरु होणार आहे. या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. याचाच भाग म्हणून परीक्षा होत असलेल्या सर्व वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत. या सीसीटीव्हीच्या चित्रीकरणाची दैनंदिन तपासणी केली जाणार असून यामध्ये गैरप्रकार आढळून आल्यास संबंधित शिक्षक, शाळा, विद्यालय यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर बैठे पथक परीक्षा कालावधीत पूर्णवेळ तैनात राहणार असून यामध्ये महसूल, जिल्हा परिषदसह इतर विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्त केली जाणार आहे. यासोबतच भरारी पथके गठीत करण्यात आली असून ही भरारी पथके अचानकपणे परीक्षा केंद्रांची तपासणी करणार आहेत. यामध्ये कोणत्याही शाळेतील शिक्षक, कर्मचारी यांनी गैरप्रकार केल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल. तसेच एखाद्या संस्था किंवा शाळा, महाविद्यालयाचा गैरप्रकारात सहभाग आढळून आल्यास त्या शाळा, महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.




# सहस्त्रकुंडला ग्रामस्थांचे उपोषण सुरु सहस्त्रकुंडापर्यंत इसापूर धरणातून पात्रात पाणी सोडण्याची मागणी



किनवट:शेख शौकत :- किनवट तालुक्यातील इस्लापूर परिसरात पैनगंगेचे पात्र कोरडे पडल्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली असून इसापूर धरणातून सहस्त्रकुंडापर्यंत पाणी सोडावे या मागणीसाठी सोमवार पासून (ता. ३ )११ गावांतील नागरिकांनी सहस्त्रकुंडाजवळील पैनगंगेच्या पात्रात उपोषण सुरू केले आहे. जोपर्यंत सहस्त्रकुंडापर्यंत पाणी येणार नाही तोपर्यंत पात्रातून उठणार नाही, अशी भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली आहे. इसापूर धरणातून पैनगंगा नदीपात्रात सहस्त्रकुंडापर्यंत पाणी सोडावे, अशी मागणी दोन महिन्यांपासून रोडा नाईक तांडा, परोटी तांडा, इस्लापूर, मुरली येथील नागरिक करीत आहेत. शासनाने याची दखल घेऊन इसापूर धरणातून पाणी सोडले परंतु सदर पाणी फक्त हिमायतनगरपर्यंतच आले. वास्तविक इस्लापूर भागातील काही गावे पैनगंगा नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. इस्लापूर येथील नळयोजनाही सहस्त्रकुंडच्या पाण्यावर अवलंबून आहे. सध्या नदीपात्रात पाणी नसल्याने जनता त्रस्त झाली आहे. यासंदर्भात ग्रामस्थांनी मुख्यमंत्री, पालकमंत्री, जलसंपदा मंत्री, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार भीमराव केराम, आमदार बाबूराव पाटील कोहळीकर यांना निवेदने दिली. त्यानंतरही नदीपात्रात पाणी न आल्याने येथील नागरिकांनी सोमवार पासून (ता ३) सकाळी ११ वाजेपासून पैनगंगा नदीपात्रात उपोषणास सुरवात केली आहे. त्यात परोटी तांडा, परोटी, इस्लापूर, इरेगाव, नंदगाव तांडा, रोडानाईक तांडा, मुरली, सॉदाबी, मंगरूळ, रीठा, सहस्त्रकुंड, येथील ५० ते ६० नागरिक व महिलांनी पैनगंगा नदीपात्रातच उपोषण सुरु केले आहे. महिला-नागरिकांची पायपीट सुरू या परिसरातील पाण्याचा मुख्य स्त्रोतच पैनगंगा नदीपात्र आहे. मागील वेळी सोडलेले इसापूर धरणाचे पाणी इस्लापूरपर्यंत न आल्याने या परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून अनेक गावांतील महिला नागरिकांना तहान भागविण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे इसापूर धरणाचे पाणी पैनगंगा नदीपात्रात सोडल्यास किमान उन्हाळ्याच्या मध्यापर्यंत वरील गावांतील पाणीप्रश्न सुटेल, असे नागरिकांचे म्हणणे आहे. वन्यजीवांची भटकंती पैनगंगा नदी कोरडी पडल्याने परिसरातील पशुधनाचा पाणी प्रश्न ऐरणीवर आला आहे तसेच वन्यप्राण्यांना तहान भागविण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. एकूणच पैनगंगा पात्रातील पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# रेल्वे वेळापत्रकानुसार कर्मचाऱ्यांचे अप-डाऊन, किनवटच्या शासकीय कार्यालयांत प्रभारीराज

किनवट:शेख शौकत :-नांदेड जिल्हा मुख्यालयापासून दीडशे किलोमीटर अंतरावर असलेल्या तालुक्यातील कार्यालयांत कायमस्वरूपी प्रशासकीय अधिकारी नसल्याने व बहुतांश कार्यालयांत प्रभारीराज असल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहेत. किनवट अनेक रेल्वे वेळापत्रकानुसार अप-डाऊनचा आजार बऱ्याच विभागांना जडला आहे. जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या किनवट पंचायत समितीला कायमस्वरूपी गटविकास अधिकारी नाही. जिल्हा परिषदेच्या बांधकाम उपविभागाला कायमस्वरूपी उपअभियंता नाही. जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची तीच परिस्थिती तिथे प्रभारी आहे. येथे उपविभागीय अभियंता नाही. कमी जास्त १० कार्यालयात रामभरोसे कारभार गटशिक्षणाधिकारी कार्यालयालाही कायमस्वरूपी गटशिक्षणाधिकारी नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, किनवटला कायमस्वरूपी प्राचार्य नाही. वनविकास महामंडळ वन प्रकल्प विभागाला कायमस्वरूपी विभागीय व्यवस्थापक नाही. उपविभागीय अभियंता पाटबंधारे कार्यालयातही प्रभारीराज आहे. महावितरण कंपनीच्या उपकार्यकारी अभियंता कार्यालयाला कायमस्वरूपी उपकार्यकारी अभियंता नाही. उपप्रादेशिक व्यवस्थापकाची आस्थापना किनवट येथे तर त्यांच्याकडे यवतमाळ, धारणी व भंडारा या तीन कार्यालयांचा प्रभारी पदभार देण्यात आला आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाला कायमस्वरूपी शाखा व्यवस्थापक नाही. आजघडीला कमी जास्त १० कार्यालयांत रामभरोसे कारभार सुरू आहे. पेसा क्षेत्रात मोडणाऱ्या किनवट तालुक्याचे वास्तव पाहता कोणी वाली आहे की नाही ? असे म्हणण्याची वेळ आली आहे. शासन व प्रशासनाने लक्ष घ्यावे कार्यालयात प्रभारीराज नको ! प्रत्येक विभागात कायमस्वरूपी अधिकारी असावे अशी मागणी नागरीकांकडून होत आहे .

# आ. कराड यांच्या सूचनेवरून मांजरा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यात पाणी सोडले; शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त

लातूर :- मांजरा प्रकल्पाचा उजवा कालवा लातूर ग्रामीण मतदार संघातील बहुतांशी गावातून जात असून रब्बी हंगामातील पिकांना पाणी देता यावे यासाठी या कालव्यात मांजरा प्रकल्पाचे तातडीने पाणी सोडण्यात यावे अशी सूचना भाजपाचे नेते आमदार रमेशआप्पा कराड यांनी केली होती= त्यांच्या सूचनेनुसार आज गुरुवारी विधिवत पूजन करून मांजरा प्रकल्प उजव्या कालव्यास पाणी सोडण्यात आले. कालव्यात पाणी सोडल्याने शेतकऱ्यातून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.

मांजरा प्रकल्पाचा उजवा आणि डावा कालवा लातूर ग्रामीण मतदार संघातून जात आहे. या दोन्ही कालव्यामुळे मतदार संघातील अनेक गावच्या जमिनी सिंचनाखाली येतात. जेव्हा जेव्हा मांजरा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला जातो त्यावर्षी या कालव्यांना पाणी सोडून जमिनी ओलिताखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना मदत केली जाते.

यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने धनेगाव येथील मांजरा प्रकल्पात पाण्याचा मुबलक साठा झाला असून कालवा सल्लागार समितीने मांजरा प्रकल्प उजवा कालव्याची पाणी आवर्तने मंजूर करण्यात आली आहे, तथापि परतीचा पाऊस जास्त झाल्यामुळे रब्बी पिकांकरिता शेतकऱ्याकडून जास्त पाण्याची मागणी नव्हती. मात्र आता पिकांना पाण्याची आवश्यकता भासत असल्यामुळे कालव्याद्वारे पाणी सोडण्याची मागणी कालवा काठच्या विविध गावातील संबंधित शेतकऱ्याकडून होत आहे.




मागील काळात मांजरा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याला काही प्रमाणात पाणी सोडण्यात आले होते. शेतकऱ्याची गरज लक्षात घेऊन तातडीने मांजरा प्रकल्प उजव्या कालव्यास पाणी सोडून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यात यावे अशी सूचना भाजपाचे नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधीकरण, लातूर यांना केली होती. आ. कराड यांच्या सूचनेनुसार आज गुरुवारी मांजरा प्रकल्पातून उजव्या कालव्यात पाणी सोडण्यात आले. यावेळी भाजपाचे नेते राजेश कराड यांच्या हस्ते यावेळी विधिवत पूजन करण्यात आले. मांजरा प्रकल्पाचे पाणी कालव्यात सोडल्याने कालव्या लगतच्या शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करून भाजप नेते आ रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

याप्रसंगी लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता अमर पाटील, उप अभियंता मितनवरे, शाखा अभियंता सूरज निकम, आशिष चव्हाण, शुभम गांभीरे यांच्यासह भाजपाचे लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, भैरवनाथ पिसाळ, श्याम वाघमारे, राजकिरण साठे, काशीनाथ ढगे, अशोक सावंत, बाळासाहेब कदम, सचिन हिंगे, शशिकांत पाटील, बापूराव बिडवे, अंकुश गणगे, मेहता बागवान व इतर भाजपा कार्यकर्ते शेतकरी मोठ्या संख्येने होते.

# घराणेशाही, आणीबाणी, ’सबका साथ, सबका विकास’ या मुद्द्यांवरुन पंतप्रधानांचा काँग्रेसवर निशाणा

नवी दिल्ली : राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी, काँग्रेसवर निशाणा साधला. जातीयवाद, घराणेशाही, ’सबका साथ-सबका विकास’ या मुद्द्यांवरुन पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. खोटेपणा, कपट, भ्रष्टाचार, घराणेशाही आणि तुष्टीकरणाचे मिश्रण असलेले राजकारणाचे मॉडेल काँग्रेसने तयार केले असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.

काँग्रेससाठी कुटुंब प्रथम आहे. म्हणूनच, काँग्रेसचे धोरण, वर्तन फक्त त्या एकाच गोष्टीला हाताळण्यातच खर्ची पडले आहे. तर देश आता ’सबका साथ सबका विकास’ च्या मार्गावर वाटचाल करू लागला आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. इतरांच्या रेषा लहान केल्यामुळे आज काँग्रेसची अवस्था अशी झाली आहे. कधी ना कधी हा देश तुम्हाला इकडे (सत्तेत) येण्याची संधी देईल, असे पंतप्रधान मोदी काँग्रेसला म्हणाले.

आणीबाणीवरुन काँग्रेसवर हल्लाबोल

संविधान वाचवण्याच्या विरोधकांच्या मोहिमेचे खंडन करण्यासाठी, पंतप्रधानांनी नेहरूंपासून आणीबाणीपर्यंतच्या घटनांचा उल्लेख करून निशाणा साधला. स्वातंत्र्यानंतर लगेचच काँग्रेसने संविधानाचा आत्मा नष्ट केला, असे ते म्हणाले. जेव्हा देशात निवडून आलेले सरकार नव्हते, तेव्हा सत्तेत असलेल्या लोकांनी संविधानात दुरुस्ती केली. निवडून आलेले सरकार येण्याची वाटही पाहिली नाही. त्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य चिरडले.

# सोलापुरात आयटी पार्क स्थापनेचे आश्वासन

सोलापूर : सोलापुरात आयटी पार्क स्थापनेचा आवश्यक प्रस्ताव तयार करावा. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे योग्य पाठपुरावा केला जाईल असे आश्वासन खासदार प्रणिती शिंदे व आमदार सुभाष देशमुख यांनी दिले.

विजापूर रोडवरील ग्रॅनाईट सेंटरमध्ये शहरातील आयटी उद्योजक व स्टार्टअपधारकांची बैठक बोलावण्यात आली. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, आमदार सुभाष देशमुख, आयटी उद्योजक माऊली झांबरे, अपूर्व जाधव, सुनील फुरडे, अजय गोरंटे, सचिन कोडमूर, यशपाल चितापुरे, सचिन चौधरी, जयंत हुले पाटील, सोलापूर विकास मंचाचे विजय जाधव, योगीन गुजर आदी उपस्थित होते.



यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले की, आयटी पार्क स्थापनेसाठी नेमके काय करावे यासाठी निश्चित कृती ठरवावी. त्यामध्ये केंद्राच्या अखत्यारीत असलेल्या बाबीसाठी पाठपुरावा केला जाईल. आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले की, सोलापूर राज्यातील पहिल्या पाच शहरात असायला हवे. त्यासाठी एकदिलाने प्रयत्न करण्याची गरज आहे. विकासासाठी पक्षभेद सोडून त्याला साथ देण्याची भूमिका घेतली आहे. सोलापूर सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून आपण हे मांडत आहोत.

आता ही आयटी उद्योजकांनी आयटी पार्कसाठी नेमके काय करावे लागते त्याचा आराखडा तयार करावा. राज्य शासनाकडे लागणारा प्रस्ताव तयार करा. त्यानुसार उद्योग मंत्री यांच्यासोबत लवकरच बैठक आयोजित केली जाईल. सोलापूरचे तरुण पुण्यात नोकरीसाठी जात असतील त्यांना सोलापुरात करिअरच्या संधी देण्याचे काम करावेच लागणार आहे. सोलापूर मोठे करण्यासाठी हे करण्याची वेळ आली आहे.

विमानसेवा आवश्यक आहे याबाबत दुमत नाही. त्यावर काम सुरू आहे. पण त्यासोबत विकासासाठी लागणारे प्राधान्याची कामांची यादी करून त्यासाठी पाठपुरावा करावा लागणार आहे. शासनाकडे आयटी पार्कसाठी द्यावयाचा प्रस्ताव तयार होताच त्यावर शासनाची मान्यता आणण्यासाठी आपण पुढाकार घेऊ असे सांगितले. यावेळी उद्योजकांनी हिंजवडी येथील राजीव गांधी इन्फोटेक पार्कचा अभ्यास दौरा करण्याचे ठरले. सोलापूरमधील आय. टी. कंपन्यांसाठी जीएसटी सवलतीवर चर्चा झाली. आय. टी. पार्कसाठी जागेची उपलब्धता आणि सबसिडायझ्ड ऑफिस स्पेसवर चर्चा झाली. एमआयडीसी आणि इतर संबंधित संस्थांशी समन्वय साधण्यासाठी कार्यगटाची स्थापना करण्याचे ठरले. डेटा सेंटर स्थापन करण्याबद्दल चर्चा झाली. सूत्रसंचालन माऊली झांबरे यांनी केले.

# काय म्हणता,मंत्र्यांच्या बंगल्याची कामेही कंत्राटदारांनी थांबविली !

नागपूर : नागपूर विभागातील ६००० कोटी आणि राज्यातील सुमारे ६४,००० कोटी रुपयांची थकबाकी सरकारकडून घेणे असल्याच्या कारणावरून आर्थिक संकटात सापडलेल्या कंत्राटदरानी विविध विभागांची सुरू असलेली बांधकाम कामे थांबवली आहेत. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, नागपूर कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन आणि विविध संघटनांनी एकत्र येत काम सुरू असलेल्या ठिकाणी धडक दिली.

सार्वजनिक बांधकाम विभागांच्या थकबाकी विरोधात बुधवारी आणि गुरुवारी कामे थांबवल्याने याचा फटका अनेक कामांना बसला. अलीकडेच थेट अधिकाऱ्यांना कामे वेळेत करा अशी तंबी देणारे महसूल मंत्री व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या रविभवनातील कॉटेज क्रमांक ११ मध्ये नवीन कार्यालय स्थापन करण्यात येत आहे. मंत्र्यांचा कक्ष, स्विय सहाय्यक, कर्मचाऱ्यांचे कक्ष अभ्यागतासाठी प्रतीक्षा शेड, विद्युत व्यवस्था अशी इतर कामे सुरू असताना संघटनेच्या नेत्यांनी रविभवनात जात हे काम थांबवले . यासोबतच जिल्हाधिकारी कार्यालयातील नूतनीकरणाचे कामही थांबले.

ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या जुन्या कार्यालय परिसरात उपजिल्हाधिकाऱ्यांसाठी व्यवस्था करण्यात येत आहे. ही सर्व कामे देखील प्रभावित झाली. विभागीय आयुक्तालयातील कामही एक-दीड महिन्यापासून थांबले आहे. एकंदरीत पालकमंत्री कार्यालयासह विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच अनेक ठिकाणच्या बांधकामांना या कंत्राटदारांच्या काम बंद आंदोलनाचा फटका बसला आहे.

सरकारने तातडीने थकबाकीची देयके जारी करावी अशी मागणी करणारे निवेदन विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी अधीक्षक अभियंत्याना देण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे विदर्भ व नागपूर कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध सरवदे यांनी दिली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE